
ब्रह्मणस्पती विनायक
अनिल अनंत वाकणकर

ब्रह्मणस्पती विनायक

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

ब्रह्मणस्पती विनायक

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ब्रह्मणस्पती विनायक (लघुकादंबरी)

संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

Email-aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ ऑक्टोबर २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन,

जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

वाचना संबधी:- गेली जवळपास ४० वर्षे अनेक प्रकारची पुस्तके वाचली. त्यातल्यात्यात कांदबरी हा प्रकार जास्त आवडीचा. योगिनी जोगळेकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, रणजित देसाई हे लेखक जास्त आवडीचे. श्रीवर्धन येथे वाचनालयात उपलब्ध असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्या वाचल्या आहेत. या शिवाय समर्थ रामदास स्वामींचे सर्व वाङ्मय, प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले याची प्रवचने या अंगाचे वाचनही आवडीचे आहे.

स्वत:चे लेखन:- समर्थ रामदास स्वामींनी याला किर्तन भक्ती असे नांव दिले आहे. आपण जे जे वाचले आहे त्यातले जे आकलन झाले ते स्वत: जवळ न ठेवता दुसऱ्याला सांगणे ही एकप्रकारची किर्तन भक्तीच आहे. हल्लीच जागतिक पर्यावरण दिनाच्या मुहूर्तावर माझी वृक्ष मंदिर ही कादंबरी दुर्गा कवच ही कथा ई साहित्य प्रतिष्ठान द्वारे प्रकाशित झालीआहे. या शिवाय मी दोन प्रवास वर्णन, तिन कथा लिहील्या आहेत.

हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/ या ब्लॉगवर उपलब्ध आहे.

लेखकाचे मनोगत

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येशु सर्वदा।।

ब्रह्मणस्पती विनायक ही कथेची मूळ कल्पना मला खूप वर्षांपूर्वी सुचली होती. १९९२ साली मी स्वंयंभू गणपती या नावाने मी कथा लिहिली होती. तीच कथा थोडेसे संदर्भ बदलून त्यात नवीन कल्पनांची भर घालून परत लिहीली आहे. दरम्यानच्या काळात मी ब्रह्मणस्पती सूक्त आणि गणपती सूक्ताची संथा घेतली. त्यामुळे नवीन कथेत तो संदर्भ आला आहे.

काही वर्षापूर्वी दिवेआगर येथे सोन्याच्या गणपतीचा मुखवटा सापडला होता. त्यावेळी माझी जुनी कथा वाचणाऱ्यांनी मला माझी कल्पनेतील कथा प्रत्यक्षात आल्याचे सांगितले होते. आज ही नवीन स्वरुपातील ब्रह्मणस्पती विनायक ही कथा सादर करताना मला खूप आनंद होत आहे. माझ्या कडून या कथेच्या निमित्ताने त्या गणेशाची जी वाङमयसेवा घडली ती त्यालाच अर्पण करीत आहे.

श्रीवर्धन
दिनांक १ जुलै २०१८ अनिल अनंत वाकणकर

अर्पण पत्रिका

।। श्री ब्रह्मणस्पती विनायक प्रसन्न ।।

त्या विद्येच्या देवतेच्या आशीर्वादाने आणि प्रेरणेन साकार झालेली ही साहित्यकृती त्या गणेशालाच अर्पण.

अनिल अनंत वाकणकर,

दिनांक १ जुलै २०१८ श्रीवर्धन जिल्हा रायगड

१



अनिल, सुरेश आणि प्रदिप तिघेजण लाटवणच्या समुद्राकिनाऱ्यावर पुळणीत गप्पा मारीत बसले होते. समुद्राचा घन गंभिर आवाज सर्वत्र निनादत होता. नुकताच सूर्यास्त झाला होता त्यामुळे क्षितिजावर आकाशात सर्वदूर गुलालाची उधळण झालेली दिसत होती. वातावरण धुसर झाले होते. धड उजेड नाही आणि धड काळोख नाही असे विलक्षण वातावरण होते.

हे तिघेही अगदी जिवश्च कंठश्च मित्र होते. त्यातला अनिल हा बेकार होता. सुरेश आणि प्रदिप दोघे छोटी मोठी नोकरी करीत होते. तिघांचेही शिक्षण एकाच कॉलेज मध्ये झाले. तिघांनाही बि. कॉम् मध्ये सारखेच मार्क मिळाले होते. सुरेश लाटवणमध्ये बदली शिक्षक म्हणून तात्पुरत्या स्वरुपात कामाला लागला होता.

त्यालाच भेटायला आज अनिल आणि प्रदिप आले होते. प्रदिप दापोली येथील एका खाजगी फार्म हाऊस मध्ये अकाउंटंट म्हणून काम करीत होता. सांगायला अकाउंटंट परंतु तेथे त्याला अनेक प्रकारची कामे करावी लागत होती.

अनिलचेही नोकरीकरीता प्रयत्न चालू होते. परंतु त्याला अद्याप नोकरी धंदा मिळाला नव्हता. सतत अर्ज विनंत्या करुन तो कंटाळला होता. त्याची घरची आर्थिक परिस्थिती देखिल बेताचीच होती. त्याचे आई वडिल आता वृध्द झाले आहेत. जवळ होते नव्हते ते किडूक मिडूक विकून त्यांनी अनिलचे बी. कॉम् पर्यंतचे शिक्षण केले होते. त्यांची थोडीफार शेती होती, त्यातून पोटापुरते भात यायचे. परंतु ती शेतीदेखिल पावसावर अवलंबून. शेतीच्या जोडीला आजुबाजुच्या गावातील पूजा, लग्न या सारखी पौराहित्याची थोडीफार कामे करुन ते प्रपंचाचा गाडा रेटत होते.

सध्या अनिल आणि प्रदिप दापोलीला एकाच खोलीत रहात होते. दापोलीतील एका चाळवजा घरात एका खोलीत दोघांचा ब्रह्मचाऱ्यांचा संसार मांडलेला होता. त्या तिघा मित्रांनी आज लाटवणला एकत्र जमण्याचे ठरविले होते. लाटवणला फिरायला जाण्यासारखे एकच ठिकाण होते, ते म्हणजे समुद्र किनारा. सुर्यास्ताची वेळ साधून आज ते समुद्रावर फिरायला व त्या निमित्ताने एकमेकांच्या सुखदु:खाच्या गोष्टी शेअर करायला आले होते.

आज अनिलची मनस्थिती ठिक नव्हती. सूर्यास्ताच्या त्या धुसर वातावरणात तर त्याची खिन्नता आणखिनच वाढली होती. बरेच दिवसाच्या बेकारीने त्याला खूपच निराश केले होते. त्या तिघांपैकी दोघे नोकरीला लागल्याने आता त्यांचे एक वेगळे विश्व निर्माण झाले होते. त्यामुळे तो सध्या तो एकटा पडला होता. आता दापोलीला मित्राच्या जिवावर रहाणे त्याला मिंध्यासारखे वाटत होते. त्या विचारातच तो सुरेशला म्हणाला, सुरेश! मला वाटते आता गावाला जाऊन रहावे. उगाचच बाबांकडे आणखी पैसे मागणे नको. घरी गेलो तर कमीतकमी बाबांना त्यांच्या शेतीच्या कामात मदत तरी करता येईल.

खरंय तुझे! दापोलीला राहून आतापर्यंत फारसा काही फायदा झाला नाही. अर्थात तू कितीही राहिलास तरी माझी काहीच हरकत नाही. परंतु तू दिवसभर एकटा असल्याने तुझी मनस्थिती जास्त निराशाजनक व्हायला लागली आहे. प्रदिप म्हणाला.

तरी पण अनिल! तू धीर सोडू नकोस. तो परमेश्वर काही झोपलेला नाही, ज्याने चोच दिली तो चारा देणारच ना! अरे हेही दिवस जातील, तो देव आपली परिक्षा बघत असतो. सुरेश म्हणाला.

मला कधी कधी वाटतं की, देव वगैरे सगळं झूट आहे. सगळं थोतांड आहे. निराश सुरात अनिल बोलला.

चला! काळोख वाढत चालला आहे आता आपण निघुया! या चर्चेतून काहीच निष्पन्न होणार नाही. शिवाय रुमवर जाऊन आपल्याला आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करायची आहे. हे काही दापोली नाही, खाणावळीत गेल्यावर आयतं ताट समोर यायला. असे म्हणून सुरेश लगेच उठलाच.

त्यानंतर प्रदिपदेखिल लगेचच उठला. सुरेशच्या बोलण्यातला अर्थ तो समजला. सुरेशला ही चर्चा आणखी वाढवून अनिलच्या नैराश्यात भर घालायची नव्हती. त्यानंतर तिघेजण समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्याने सुरेशच्या रुमकडे जायला लागले. वाटेल अनिलला ठेच लागली आणि तो जोरात आSS आईSS गं असे ओरडला. त्याचा आवाज ऐकून प्रदिपने विचारले, काय रे काय झाले? त्यावर अनिलने काही नाही रे जोरात ठेच लागली.

त्यावर सुरेशने इथे समुद्र किनाऱ्यावरील पुळणीत आणि ठेच कसे काय शक्य आहे? असे विचारले आणि आपल्या हातातल्या बॅटरीचा प्रकाश अनिलच्या पायावर पाडला. बघतोय तो अनिलच्या पायाच्या करंगळीतून रक्त येत होते. ते रक्त बघुन सुरेशने पायाच्या बाजुला बॅटरीचा प्रकाश पाडला.

अरे हे काय! इथे पुळणीत गणपतिची मूर्ती कशी काय? अनिल आश्चर्याने बोलला.

अरे मागे याच किनाऱ्यावर अशीच एक शंकराची पिंडी देखिल सापडली होती. सुरेशने सागितले.

त्यानंतर त्या तिघांनी ती वाळुत रुतलेली गणपतिची मूर्ती बाहेर काढली. तिला समुद्राच्याच पाण्याने स्वच्छ धुतली. त्यानंतर तिचे स्वरुप प्रकट झाले. गणपति अथर्वशिर्षामध्ये वर्णन केलेल्या "एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुश धारणं रदंच वरदं हस्तैर्बिभ्राणं मुषकध्वजम्" प्रमाणे ती गणेशाची मूर्ती होती.

आता त्या तिघांपुढे प्रश्न पडला या मूर्तीचे काय करायचे? तिथेच ती मूर्ती टाकून जाणे त्यांच्या श्रद्धाळु मनाला पटेना. दापोलीच्या किंवा लाटवणमधल्या खोलीत एवढी मोठी मूर्ती ठेवणे शक्य नव्हते. कारण तिथे जेमतेम त्यांना झोपण्यापूर्ती जागा होती.

मी माझ्या गावी ही मूर्ती नेली तर? नाहीतरी माझ्या गावांत गणपतिचे मंदिर नाहीये. अनिलने आपले मत मांडले.

काहीच हरकत नाही! कारण मागे अशीच सापडलेली शंकराची पिंडी लाटवणच्या लोकांनी परत समुद्रात सोडली होती. ही मूर्ती देखिल अशीच परत सागरार्पण करतील.

****

२

"कोंकण दरिद्री बोलते कोण, छे छे ती सोन्याची सुंदर खाण" या कवितेतील उक्ती प्रमाणे सर्व कोंकण प्रदेशच निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. हिरवेगार डोंगर, जांभ्या दगडाच्या पाखाड्या, जांभ्या दगडाचीच घरे हे तर कोंकणचे वैशिष्ट. रत्नागिरी जिल्हा हा त्या कोंकणाचाच एक भाग. त्या रत्नागिरी जिल्ह्यातील महत्वाचा तालुका आहे दापोली तालुका. दापोली तालुक्यातील मंडणगडहून दापोलीला जाणाऱ्या रस्त्यावर असणारे भोस्ते हे गांव देखिल कोंकणाच्या वर्णनाला साजेसेच आहे. येथील जांभ्या दगडाच्या पाखाड्या, घनदाट जंगल, उंच डोंगर आणि खोल दऱ्या हे या गावाचे वैशिष्ट. येथील जंगलात, साग, ऐन, किंजळ, असाणा ही झाडे विपुल प्रमाणात आढळतात. घरांजवळच्या परसात आंब्याची कलमे, रातांब्याची, जांभळाची, फणसाची, काजुची झाडे हे या गावाचे वैभव.

डोंगर उतारावर टप्या टप्यावर सुपारीची झाडे त्या झाडांना पाणी देण्याकरीता बांधलेले पाट हे इथले वैशिष्ट आहे. डोंगर उतारावर भात, नागली, वरी लागवडीकराता बारीक बारीक चोंढे पाडलेले सर्वत्र दिसतात. अशा या भोस्ते गांवात दिवसातून दोन वेळा एस्. टी. ची बस येते. दापोली मंडणगड हा रस्ता हा डांबरी आहे. परंतु त्या रस्त्यापासुन भोस्ते गावापर्यंत येणारा रस्ता लाल मातीचा आहे. कोणतेही वाहन त्या रस्त्यावरुन गेले की, सर्वत्र धुळीचे लोटच्या लोट उठतात. त्यात एस्. टी. ची बस आल्यावर तर उडणारी लाल धुळ जवळपास असणाऱ्या सर्वांना लालेलाल करुन टाकते. मग ती माणसे असोत, जनावरे असोत किंवा झाडे असोत. रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडांची सर्व पाने लाले लाल झालेली असतात.

दापोलीहून संध्याकाळी सहा वाजता सुटणारी दापोली भोस्ते बस नेहमी प्रमाणे उशीरा सुटली. तिला भोस्ते गाव गाठे पर्यंत काळोख पडायला आला होता. ही बस भोस्ते येथे वस्तीला असते. गावाच्या तिठ्यावर असणाऱ्या पिंपळाच्या पारावर नेहमीप्रमाणे रिकामटेकड्या लोकांची बैठक बसलेली होती. त्यातच आता शेतीचा हंगाम संपला होता. त्यामुळे शेतावर जाण्याचे काही काम उरले नव्हते.

एस्. टी. बसच्या ड्रायव्हरने गाडी रिव्हर्समध्ये घेऊन तिचे तोंड परत दापोली कडे जाणाऱ्या रस्त्याकडे केले आणि तो उडी मारुन खाली उतरला. दरम्यान पारावरच्या मंडळींचे गाडीत कोण कोण दिसतेय याचे निरीक्षण चालू होते. गाडीमध्ये ड्रायव्हर कंडक्टर आणि एकच प्रवासी दिसत होता. तिघेही लालमातीने पुरे माखले होते. गाडी थांबताच गाडीतल्या प्रवाशाने पारावर बसलेल्या विठुकाका उर्फ विठ्ठल शिंदे यांना हाक मारली.

अहोS विठुकाका! मला ही ट्रंक उतरायला मदत करा नां.

त्याची हाक ऐकून पारावर आपल्याच विचारात दंग असलेले विठुकाका दचकून उभे राहिले. त्यांनी हाक मारणाऱ्या प्रवाशाकडे निरखुन पाहिले आणि ते म्हणाले, कोण अनिल बाळ! अरे एवढ्या उशिरा कसा काय आलासं? आणि ट्रंकेत एवढे जड काय आणले आहेस? असे म्हणून त्यांनी अनिलला ट्रंक उतरायला मदत केली.

काही नाही काका! दापोलीचे बिऱ्हाड गुंडाळुन सर्व सामान आणले आहे. अनिलने विठु काकांना उत्तर दिले. त्यानंतर पारावरच बसलेल्या तुकाराम अण्णांना मदतीला घेऊन तो ती ट्रंक घेऊन आपल्या घराकडे गेला.

इकडे पारावर लगेच चर्चा सुरु झाली. काय हो विठुकाका हा परांजप्यांचा अनिल नां? एकाने विचारले.

काय हो एवढा बॅलिस्तर झाला आणि परत गावाला कसा काय आलाय? दुसऱ्याने आपली पिंक टाकली.

अहो! असे बॅलिस्तर हल्ली गल्लो गल्ली असतात. त्यांना विचारतय कोण? परत पहिल्याने आपले मत टाकले.

नायSहो आपला अनिल बाळं कुठबी सापडणारा बॅलिस्टर नाय! तो खराचं डोकेबाजं पोर हाय! पण परत का आला काय जाणं? पण पोर लयं वाळलाय ह्या बाकी खरां! विठूकाकांनी आपले मत सांगितले आणि ते गावाच्या रस्त्याला लागले.

****

३

सकाळचे सहा वाजले होते. रेडीओवर सकाळचा भक्ती संगिताचा कार्यक्रम लागलेला होता. लता मंगेशकर यांच्या सुमधुर आवाजात “गजानना श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया” हे गणेशाला वंदन करणारे गीत लागले होते. अजून सुर्योदय झाला नव्हता. आता कोणत्याही क्षणी सुर्योदय होईल आणि पूर्व दिशेला लाल रंगाची उधळण होईल असे वातावरण होते. हवेत हलकासा गारवा होता. लतादिदिंच्या भावमधुर आवाजाने वातावरण भक्तीमय झाले होते.

रोज पहाटे पांचाच्या ठोक्याला उठणारे थोरात गुरुजी आज जरा उशिरा उठले होते. रात्री अंगात थोडी कण कण असल्याने जाग आली तरी अंथरुणात पडुन राहिले होते. परंतु रेडिओवरच्या लता दिदिंच्या गजानना श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया या गाण्याने त्यांची मरगळ कुठल्या कुठे पळुन गेली. थोरात गुरुजी पक्के गणेश भक्त आहेत. दर संकष्टी चतुर्थीला ते उपवास करतात. नित्यनेमाने रोज आंघोळ झाल्यावर ते गणपति अथर्वशिर्ष म्हणतात. आजच्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशी प्रभात समयाला गणेश वंदना ऐकून त्यांचे मन प्रसन्न झाले. लगेचच अंथरुण सोडून ते आपल्या दैनंदिन व्यवहाराला लागले.

ते अंथरुणातून उठतात नाही तोच त्यांच्याकडे भांडी घासायला येणारी सगुणा मोठ्या मोठ्याने गुरुजींना हाक मारत त्यांच्या घराकडे आली. “अहो गुरुजी! तुम्हाला समजला काय, परांजप्यांच्या वावरात म्हणं गणपति बाप्पा गावलाय!”

काय सांगतेस काय सगुणे! अगो आज पौष महिन्यातली संकष्टी चतुर्थी आहे आणि साधी नाही अंगारीका संकष्टी आहे आज! काय समजलीस! ! आज गणपति

सापडणे म्हणजे फार चांगला योगायोग आहे. पण काय गं सगुणे तुला ही बातमी कोणी दिली? तू स्वत: पाहिलेस काय! थोरात गुरुजी एकदम उत्साहीत सुरात म्हणाले.

नाय वो गुरुजी! आमचं मालकच परांजप्यांच्या वावरात कामाला हैती! गेले आठ दहा दिवस त्यांच्याच वावरात काम चालू हायं बघा. नानांचा ल्येक दापोलीस्न आलाय तो बाव पाडतोय म्हणं! सगुणेने उत्तर दिले.

बरं! बरं! मीच बघतो तिकडे जाऊन काय प्रकार आहे तो. असे म्हणून गुरुजींनी आपले आन्हीक पटापट आवरायला सुरवात केली. तसे ही आज शाळेत जाणे होणार नव्हतेच. कारण दर संकष्टीला त्यांची शाळा सकाळची असते. त्यांना ताप आल्याने आज त्यांनी सुट्टीच घेतली होती.

****

४

नाना परांजपे हे भोस्ते गावातील एक शांत आणि समंजस व्यक्ती आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच आहे. परंतु ते खाऊन पिऊन सुखी आहेत. रोजच्या वरणभाताला तोटा नाही. हां, रोकड, नसेल फारशी. परंतु खलाटीला पोटापुरते भात पिकणारी शेती आहे. त्यातून खंडिभर भात पिकते. जोडीला जवळच्या चार गावांचे पौराहित्य ते करतात. कोणाचा सत्यनारायण, कोणाची घरभरणी, कोणाचे लग्न, तर कुठे बारसे कधी बारावा देखिल ते करतात. त्यातून फारशी कमाई होते असे नाही. कारण ते हे काम सेवा म्हणून करतात. कोण काय देईल ते न बघता खिशात टाकतात. मिळालेला शिधा, फळे त्यांच्या घरापर्यंत कधीच येत नाहीत. वाटेत भेटणाऱ्या बाळगोपाळांना ते फळफळावळे वाटुन मोकळं होतात. शिधा देखिल कोणी गरजु भेटला तर त्याला देऊन मोकळे होतात. त्यामुळे कधी कधी पदरचे पैसे घालून प्रवास खर्च केला जातो. त्यामुळेच नाना परांजपे सर्वांना हवेसे वाटतात. सर्वांनाच ते आपल्या घरातलेच वाटतात.

त्यांचे घर गावाच्या मध्यवर्ती भागातच होते. त्यांच्या घरासमोर जांभ्या दगडाची पाखाडी आहे. घराच्या पाठीमागेच त्यांची खलाटी आहे. खलाटीच्या बाजुला थोडीशी जांभ्या दगडाचा कातळ असलेली डोंगराळ जमिनही त्यांचीच आहे. तेथे गवताशिवाय काही पिकत नाही. आज त्यांच्या घराच्या पाठिमागच्या खलाटीत बरीच गर्दी जमलेली दिसत होती. खलाटीच्या एका कोपऱ्यात विहिरी सारखे काहीतरी खणलेले दिसत होते. खड्डा साधारण पाच साडेपांच फुट एवढा खोल दिसत होता. सगळीकडे मातीच माती झालेली होती. एकीकडे मातीचा मोठ्ठा डोंगर तयार

झालेला दिसत होता. खड्याच्या मध्यभागी साधारण दोन फुट उंचीची संगमरवरी मूर्ती दिसत होती. त्या मूर्तीच्या पायाशी ताजी फुले वाहिलेली दिसत होती.

थोरात गुरुजींनी जमलेल्या गर्दीतून वाट काढीत पुढे जायला सुरवात केली. भोस्ते गावातील जवळ जवळ सर्वच आबालवृद्ध येथे जमा झाले होते. एवढ्याशा गावांत ही बातमी पसरायला जेमतेम अर्धातासच लागला असेल. जो तो पुढे पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होता. सर्वांचा एकच गलका चालू होता. त्यामुळे थोरात गुरुजींना त्या गर्दीतून पुढे जायला जरा वेळच लागला. ते पुढे जाऊन पहातात तो काय, ते रोज पठण करीत असलेल्या गणपति अथर्वशिर्षातील "एकदंतं चतुर्हस्तं पाशमं कुशधारिणंरदंचवरदं हस्तैर् बिभ्राणं मूषकध्वजम्" या वर्णनाबरहूकुम ती संगमरवरी मूर्ती दिसत होती. तरीही अजून त्या मूर्तीला नीट साफ केले नव्हते. बरीच धुळ मूर्तीवर दिसत होती. त्यामुळे ती मलिन झालेली दिसत होती. गणेशाचे ते देखणे रुप पाहून गुरुजी सद्गदित झाले आणि त्यांनी त्या धुळीतच त्या अद्भुत रुपासमोर साष्टांग दंडवत घातला. त्यांचे पाहून गर्दीतील एक एकजण पुढे येऊन त्या धुळीतच गणेशाला सांष्टांग नमस्कार घालु लागला.

सर्वांचे दर्शन घेऊन झाल्यावर एक एक जण आपापल्या उद्योग धंद्याला निघुन गेले. तिथे मोजकेच लोक उरले. त्यात थोरात गुरुजी, अर्जुन शिंदे, अनिल आणि नाना परांजपे आणि एक दोन गावकरी असे पांच सहाजणच तिथे शिल्लक राहीले.

आता बोलण्याचा पुढाकार थोरात गुरुजींनी घेतला. नाना! आज अंगारिका संकष्टी चतुर्थी आहे आणि आजच्या या पवित्र दिवशी आपल्या गावांत श्री गजाननाचे आगमन होणे ही फार मोठी घटना आहे. या घटनेने आपल्या गावाची भरभराट होईल. या आनंददायी प्रसंगी आपण या गणेशाचे नम्रपणाने स्वागत करुया! बोलता बोलता गुरुजींचा आवाज कातर झाला. त्यांच्या डोळयांतून घळा घळा पाणी वहायला लागले.

व्हय! व्हय! आक्षी बराबर हाय तुमचं गुर्जी! पन आता त्या द्येवाला कवा पास्न धुळीत ठेवलया त्याला आदी भायर काडुया. अर्जुन शिंदेंनी सुचना केली.

अहो गुरुजी! आमच्या घराण्यांत अनेक पिढयांपासुन ब्रह्मणस्पतीसूक्ताचे पठण केले जाते. त्यामुळे त्या उपासनेच्या परंपरेचे फलस्वरुप म्हणून हा "ब्रह्मणस्पती विनायक" आमच्या परसात प्रकट झाला अशी माझी भावना आहे. म्हणून या बाप्पाला आपण "ब्रह्मणस्पती विनायक" या नांवाने संबोधुया. या बाप्पाची पूजा करताना गणपती सूक्त आणि ब्रह्मणस्पती सूक्त यांचे अनुष्ठान केल्यास विशेष फलप्राप्ती होईल अशी माझी धारणा आहे.

पण नाना! एवढी साजरी मूरत कशी काय गावली? एका गावक़ऱ्याने सहजच चौकशी केली. वास्तविक सगळयांच्या मनांत हाच प्रश्न होता.

त्याचं काय झाले, बि. कॉम् झाल्यापासुन मी नोकरीच्या प्रयत्नाकरीता दापोलीत रहात होतो. परंतु या वशिल्याच्या जमान्यात मला अजून पर्यंत काही नोकरी धंदा मिळाला नाही. तिथे रिकामे बसण्यापेक्षा नानांना शेतीच्या कामात मदत होईल म्हणुन मी परत गावाला यायचे ठरवले. आता घरी परत आलो आहेच तर काही आंब्याची, काजुची कलमे लावावी हा विचार केला. त्या कलमांना पाण्याची सोय व्हावी याकरीता डव़ऱ्यासारखी विहिर खोदायची ठरवले. म्हणून गेले आठ दहा दिवस सहदेवच्या मदतीने डवरा खोदायला सुरवात केली. अनिलने झालेली हकिगत सांगायला सुरवात केली.

अरे अनिल! थांब हे सगळे नंतरही समजले तरी चालेल. पण त्याआधी अर्जुन शिंदे यांच्या म्हणण्या प्रमाणे आपण देवाला किती काळ ताटकळत ठेवणार. आधी आपण बाप्पाला खड्यातून बाहेर काढु. त्याची विधिवत पूजा अर्चा करु नंतर सावकाश सगळी हकिगत सांग. कसे काय मंडळी?

आक्षी बराबर हाय! सगळ्या गावकऱ्यांनी सामुहीक उत्तर दिले. त्यानंतर सर्वांनी मिळुन गणपती बाप्पाची मूर्ती बाहेर काढुन तिला स्वच्छ धुतली. खणलेल्या डवऱ्यातून निघालेले जवळपास पडलेले जांभे दगड गोळा करुन त्याचा एक ओटा तयार केला. त्यावर मातीचा भराव करुन ती चोपण्याने व्यवस्थित दाबून त्यावर गायीच्या शेणाने सारवण काढुन त्यावर गणपती बाप्पाची तात्पुरती प्रतिष्ठापना केली.

****

५

दापोली हे रत्नागिरी जिल्ह्यातील महत्वाचे आणि तालुक्याचे ठिकाण आहे. दापोली येथील महत्वाचे ठिकाण म्हणजे कोंकण कृषी विद्यापिठ. या शिवाय कोळथरे, आसुद, अंजर्ले या सारखी पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची ठिकाणे आहेत. जवळच्या अनेक गावांची बाजारपेठ दापोलीलाच आहे. येथील सर्वच ठिकाणांना भेट देण्याकरीता एस्. टी. हे स्वस्त आणि सहज मिळणारे साधन आहे. त्यामुळेच येथील एस्. टी. स्टँडवर सतत गर्दी असते. येथुन पुणे, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, कोल्हापुर या लांब पल्ल्याच्या तर हर्णे, मंडणगड, दाभोळ, खेड, केळशी या सारख्या लोकल बस सुटत असतात. त्यामुळे या स्टँडवर प्रवासी, पर्यटक आणि एस्.टी. च्या स्टाफची सदैव गर्दी असते. या स्टँडच्या परिसरातच कर्मचाऱ्यांनी बांधलेले दत्तात्रेयांचे मंदिर आहे.

एस्. टी. स्टँडवर असणाऱ्या या दत्तमंदिरात आत्ता पांच सहा ड्रायव्हर कंडक्टर गप्पा मारीत बसले आहेत. त्यांच्यापैकी काहींची ड्युटी संपलेली होती. तर काहीजण आपल्या ड्युटीची वेळ होण्याची वाट बघत मंदिरात बसले होते. त्यांच्या मध्ये वेगळी दिसणारी एक व्यक्ती देखिल तिथे दत्ताचे दर्शन घेण्याकरीता आलेली आहे. ड्रायव्हर कंडक्टर आज कोणाला कुठली ड्युटी आहे याची चर्चा करीत बसले होते.

त्यांच्यात वेगळा दिसणारा तो प्रवासी दापोलीला पर्यटनाकरीता आलेला आहे हे जाणवत होते. त्याच्याजवळ फारसे सामान दिसत नव्हते. बहुदा मुंबईहून आलेला असावा. झोळीसारखी एक पिशवी त्याने आपल्या बाजुला ठेवलेली दिसत होती. तो दत्ताच्या मूर्तीकडे एकटक बघत ध्यान लावल्यासारखा डोळे मिटुन बसला होता. तरीही त्याचे लक्ष तिथे चालणाऱ्या चर्चेकडे देखिल होते.

त्या मंदिरात बसलेले चव्हाण ड्रायव्हर आणि यादव कंडक्टर हे बरोबरच एस्. टी.त नोकरीला लागले होते. ते दोघेही ड्युटीला जाताना आणि ड्युटीवरुन उतरल्यावर न चुकता या दत्त मंदिरात दर्शनाला येत असत. यादवने चव्हाणांना

विचारले, काय रे चव्हाण! काल तू भोस्ते वस्तीला होतास नां? तिथे म्हणे गणपती सापडला आहे! खरे आहे काय?

हो, मी काल भोस्त्यालाच वस्तीला होतो. आणि तू ऐकलेस ते खरे आहे. आपले परांजपे काका आहेत नां, त्यांच्याच परसात बाप्पाची मूर्ती सापडली आहे. मोठी लोभस मूर्ती आहे. त्या बाप्पाच्या नुसत्या दर्शनानेच मनातल्या इच्छा जणू पूर्ण होतील. मी कालच तिथे गेलो होतो. परवाच्या अंगारकी चतुर्थीला सापडला म्हणतात. चव्हाणांनी आपला अनुभव सांगितला. पण काय रे, आज तुझी भोस्ते वस्तीचीच ड्युटी आहे नां?

हो! आज माझी भोस्ते वस्तिचीच ड्यूटी आहे. म्हणूनच मी तुझ्याकडे चौकशी केली. यादव कंटक्टर बोलले.

त्यांची ही चर्चा ऐकून तिथेच बसलेला तो प्रवासी त्यांच्या चर्चेत भाग घेत म्हणाला, काय हो यादव भाऊ! आपली आत्ता चाललेली गणपती संबंधीची चर्चा मी ऐकली आणि ती ऐकून मलाही त्या गणपतीचे दर्शन घेण्याची इच्छा झाली आहे. आपण आज तिकडेच जात आहात तर आपल्या बरोबर मी देखिल तिकडे आलो चालेल कां?

या की! मला काय प्रॉब्लेम आहे. तुमचे तिकिट तुम्हीच काढणार आहात. पण एक आहे, मी जातोय ती गाडी वस्तीची आहे. तुम्हाला एकदा तिकडे गेलात की, सकाळी आमची गाडी परत निघेल त्याशिवाय दुसरे वाहन मिळणार नाही. कारण भोस्ते गांव एकदम आड बाजुला आहे. अर्थात तुमची झोपायची सोय तिथेच कुठेतरी होईलच. समजा नाहीच झाली तर या गाडीतच आणि बसल्या बसल्या झोप काढा. यादवांनी सविस्तर माहिती दिली.

****

६

संध्याकाळी सहा वाजता दापोलीहून आलेल्या एस्. टी.तून यादव कंडक्टर, गाडीचे ड्रायव्हर आणि तो दाढीवाला प्रवासी असे तिघेजण भोस्त्याला उतरले. गाडी व्यवस्थित बंद करुन तिघेही गावाच्या दिशेने निघाले तो त्यांना लाऊड स्पीकर मधून गणपतीची गाणी ऐकायला येऊ लागली. ते तिघेही त्या आवाजाच्या दिशेने निघाले. जवळ जाऊन पहातात तो तिथे एक झापांचा मंडप ऊभारलेला दिसला. त्या मंडपात एक दगड मातीचा बनवलेला ओटा बांधलेला दिसला त्या ओट्याला केळीच्या खांबांच्या आणि हिरव्या झापांच्या सहाय्याने मखर केलेले होते. त्या मखरामध्ये दोन बाजुच्या समयांच्या प्रकाशात त्यांना गणेशाची मूर्ती स्थापन केलेली दिसत होती. गणरायाच्या एका हातात परशु, दुसऱ्या हातात पाश, एक हात भक्तांना आशिर्वाद देत होता तर एका हातात मोदक होता. गणपतीच्या गळयात मोत्यांचा हार कोरलेला होता तो अगदी अस्सल वाटत होता. डाव्या खांद्यावरुन खाली आलेले जानवे शोभत होते. कमरेला नागबंद कोरलेला दिसत होता. गणपतिच्या गळयांत ताज्या हिरव्यागार दुर्वांचा हार दिसत होता. गणेशाच्या पायावर रक्तवर्ण असलेल्या जास्वंदीची फुले शोभत होती.

गणेशाचे हे लोभसवाणे आणि मनाला प्रसन्न करणारे रुप पाहून तिघेही त्याच्या समोर नत मस्तक झाले. तिघांनिही त्या दिव्य स्वरुपाला साष्टांग नमस्कार केला. त्या तिघांनाही तिथे असलेल्या एका भक्ताने सुंठवड्याचा प्रसाद दिला. त्यानंतर ते तिघेही तिथेच अंथरलेल्या निळया प्लॅस्टीक कापडावर बसले. दर्शन झाल्यावर एस्. टीचे ड्रायव्हर कांबळे म्हणाले, तुम्ही बसा निवांत! मी गाडीत जाऊन बसतो, कारण माझ्यावर गाडीची जबाबदारी आहे.

काय हो यादवभाऊ! आपल्याला इथे कोणी या गणपतीची बाप्पाची सविस्तर माहिती सांगणार नाही काय? त्या अनोळखी प्रवाशाने विचारले.

मी ओळखीचे कोणी दिसतय काय ते बघतो! मलाही सगळी माहिती ऐकण्याची उत्सुकता आहेच. अरे वा! ते बघा तिकडुन थोरात गुरुजी येताना दिसतायत, त्यानांच आपण सविस्तर माहिती विचारु. त्यानंतर लगेचच यादव कंडक्टर थोरात गुरुजींकडे गेले आणि त्यांना नमस्कार करुन म्हणाले, गुरुजी मला ओळखले काय?

नाही हो! पण आपल्या गणवेषावरुन आपण आत्ता वस्तीला आलेल्या एस्. टी. चे कंडक्टर दिसताय. पण क्षमा करा आपले नांव काही माझ्या लक्षांत येत नाही.

अहो गुरुजी मी अमोल यादव, आपलाच विद्यार्थी आहे. आपण माझ्या गावाला खेर्डीला शिक्षक होतात. आपण मला तिसरी ते सातवी असे पांच वर्षे शिकविले आहे. आपण मला ओळखले नाही ते बरोबरच आहे आपल्या हाताखाली अनेक विद्यार्थी दरवर्षी जातात. आपण कोणा कोणाची नांव लक्षांत ठेवणार. त्यातच शाळेत असणारा अमोल आणि आताचा मी यात खूपच फरक पडला आहे. बर ते सगळे असुदे! माझ्याबरोबर मुंबईचे एक गृहस्थ खास या गणपतिचे दर्शन घेण्यासाठी आले आहेत. त्यांना या गणपतिची सविस्तर माहिती हवी आहे. अर्थात मलाही ती ऐकण्याची खूप उत्सुकता आहेच.

ठिक आहे! मी तुम्हा दोघांची ज्यांच्या परसात हा गणपती सापडला आहे त्यांची म्हणजेच अनिल आणि नाना परांजपे यांची गाठ घालून देतो. त्यानंतर थोरात गुरुजींना घेऊन अमोल यादव त्या गृहस्थांकडे गेले.

त्याच्या जवळ येताच थोरात गुरुजींनी त्यांना नमस्कार केला आणि मी थोरात गुरुजी येथील प्राथमिक शाळेत शिक्षक आहे. अशी ओळख करुन दिली.

त्यानंतर त्या गृहस्थाने देखिल, नमस्कार मी सुभाष सोनावणे, मुळचा मी दापोली तालुक्यातला कोळथऱ्याचा आहे. परंतु माझे वडिल गिरणी कामागार म्हणून

मुंबईला गेले ते तिथेच स्थाईक झाले म्हणून मी मुंबईचा. एका नामवंत दैनिकांत मी वार्ताहर म्हणून काम करतो. कालपासुन कोंकण कृषी विद्यापिठात एक सेमिनार होता तो कव्हर करायला आलो होतो. आज परत मुंबईला जाण्याकरीता बस स्टँडवर आलो होतो. तेव्हा तिथल्या दत्ताच्या देवळात दर्शनाला गेलो होतो. तेव्हा तिथे इथल्या गणपतिची चर्चा चालू होती. ती ऐकून उत्सुकता म्हणून इकडे आलो. परंतु मला आता येथील बाप्पाची सविस्तर माहिती ऐकायची इच्छा आहे. सोनावणे यांनी आपला परिचय करुन दिला आणि आपला इथे येण्याचा उद्देश देखिल सांगितला.

सोनावणे साहेब! मी आपले या भोस्ते गावात येथील ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करतो. आता आपण माझ्या घरी चला तेथे फ्रेश व्हा. त्यानंतर श्री गजाननाच्या आरतिला आपण येऊ. आरति झाल्यावर आपण ही बाप्पाची मूर्ती ज्यांच्या परसात सापडली त्या नानांची आणि त्यांचा मुलगा अनिल यांची भेट घेऊ. ते तुम्हाला सविस्तर हकिगत सांगतील. अमोल तुही आमच्याबरोबर चलं, जरा फ्रेश होऊन आरति झाल्यावर प्रसाद वगैरे घेतल्यावर तू वाटल्यास गाडीत झोपायला जा. हे सोनावणे साहेब आज माझ्याकडेच झोपतील.

****

७

गणपतीबाप्पाची आरती झाल्या नंतर सर्व गावकरी आपापल्या घरी गेले. बाप्पाच्या मंडपात अनिल आणि नाना परांजपे, सोनावणे साहेब, थोरात गुरुजी, अमोल यादव, विठुकाका एवढी लोकच शिल्लक राहीले. सर्व गावकरी जाताच थोरात गुरुजींनी सोनावणे साहेब आणि अमोल यांना अनिल आणि नानांच्या जवळ घेऊन गेले. ते म्हणाले नाना आणि अनिल हे सोनावणे साहेब आपल्या दापोली तालुक्यातलेच आहेत मुळचे सध्या मुंबईला वास्तव्यास असतात. ते एका मोठ्या दैनिकात काम करतात. काल ते दापोलीला विद्यापिठात कामानिमित्त आले होते. तेव्हा दापोली एस्. टी. स्टॅंडमध्ये आपल्या बाप्पाच्या आगमनाची बातमी समजली म्हणून आज ते मुद्दाम आपल्या गावाला बाप्पाच्या दर्शनाला आलेत. हा अमोल यादव माझा विद्यार्थिच आहे. आज तो आपल्या वस्तीच्या एस्.टी.वर कंडक्टर म्हणून आला आहे. सोनावणे साहेबांना तोच येथे घेऊन आलाय.

नमस्कार सोनावणे साहेब आणि अमोल आपले बाप्पाच्या चरणापाशी स्वागत आहे. मी अनिल परांजपे आणि हे माझे वडिल नाना. आपण मुद्दाम बाप्पाच्या दर्शनाला आलात हे ऐकून आनंद झाला. त्यानिमित्ताने आपल्या सारख्यांचे पाय या गावाला लागले.

नमस्कार! माझा परिचय थोरात गुरुजींनी करुन दिलाच आहे. आम्ही मुळचे कोळथऱ्याचे. माझे वडिल नोकरी धंद्या निमित्ताने मुंबईला गेलो ते तिकडेच स्थाईक झाले. तरीही आम्ही दरवर्षी न चुकता गणपतीला येत असतो. अंजर्ले येथील कड्यावरच्या गणपतिला देखिल दरवर्षी माघी चतुर्थीला आम्ही येत असतो. आमचे

घराणे तसे गणेश भक्त आहे. आपल्या बाप्पाचे वर्णन दापोलीला ऐकल्यावर राहवले नाही म्हणून इकडे आलो. आपण मला या गणपतिच्या आगमनाची सविस्तर माहिती सांगाल काय? मला खूप उत्सुकता आहे.

नक्कीच सांगतो! परंतु आता आपण या थोरात गुरुजींना देखिल बरोबर घेऊन माझ्या घरी जाऊ तिथे बाप्पाचा प्रसाद म्हणून चार घास खाऊ. त्यानंतर निवांत बोलत बसु. काय गुरुजी चालेल नां?

अहो नाना मीच या दोघांना माझ्या घरी जेवणाकरीता नेणार होतो. परंतु ठिक आहे. आपण बाप्पाचा प्रसाद म्हटल्यावर मी नाही म्हणू शकत नाही. चला तर मगं! पण इथे मंडपात कोणीतरी थांबायला पाहिजे नां? थोरात गुरुजी बोलले.

गुर्जी! त्याची कालजी नको! मी हाय इथं. विठुकाका स्वत:हून बोलले.

****

८

रात्री सगळयांची जेवणं झाल्यावर नाना, अनिल, थोरात गुरुजी, सोनावणे साहेब, अमोल यादव, विठुकाका सगळेजण बाप्पाच्या मंडपात सतरंजीवर बसले होते. अनिलने बाप्पाच्या आगमनाची सुरवातिपासुनची हकीगत सांगायला सुरवात केली.

सोनावणे साहेब मी दापोली येथे शिक्षणाकरीता रहात असे तेथेच मी अगदी प्रथम श्रेणीत बि. कॉम् झालो. त्यानंतर काही दिवस नोकरी धंदा शोधण्याकरीता राहिलो होतो. माझ्या बरोबरीच्या सगळयांना काहीना काही काम मिळाले परंतु मी एकटाच बेकार राहिलो होतो. माझ्याकडे ना वशिला होता! ना पैसा! त्यामुळे माझे तेथे नोकरीचे काही जमले नाही. मला दापोली येथे बेकार बसुन रहाणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नव्हते. म्हणून मी विचार केला नानांना शेतीत काही मदत करुया. घरी थोडीफार जमिन आहे. परंतु त्यातली बरीचशी डोंगराळ जांभ्या दगडांची आहे. त्यामध्ये आंब्याची कलमे लाऊन शेतीच्या उत्पन्नाला जोड मिळवु असा विचार केला. परंतु त्या झाडांना देण्याकरीता पाण्याची काहीतरी तजबिज करायला पाहिजे होती. म्हणून मी आमच्या परसांत म्हणजे आता आपण बसलोय त्या भागात एक डवरा काढावा असा विचार करुन मी सहदेवच्या मदतीने खणायला सुरवात केली. आठ दिवसात आम्ही जवळपास पांच फुट खणले असेल. त्यानंतर एके दिवशी दिवसभर खणाखणी करुन दमल्यावर जेवण झाल्याबरोबर झोपलो. पहाटे मला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात आता आपण बघत आहोत तशी गणेश मूर्ती दिसायला लागली आणि मला

बाहेर काढ असे म्हणू लागली. जागा होऊन बघितले तर घड्याळात पहाटेचे साडे तीन वाजले होते. मग मी बाबांना उठवले. त्यांना मी मला पडलेले स्वप्न सांगितले.

आमचे बाबाही गणेशभक्त आहेत. किंबहूना आमच्या घराण्यातच गणेश भक्तीचा वारसा आहे. दर महिन्यातल्या दोन्ही चतुर्थीला आमच्या पंजोबांपासुन ब्रह्मणस्पती सूक्त पठण करण्याची प्रथा आहे.

अनिलचे बोलणे मध्येच थांबवून नाना म्हणाले, मला अनिलने साडेतीनच्या नंतर उठवले आणि त्याला पडलेले स्वप्न सांगितले. त्यावर माझ्या मनांत विचार आला कदाचित त्या बाप्पाला आमची भक्ती मान्य झाली असेल म्हणून त्याने आमच्याकडे यायचे ठरविले असेल. म्हणूनच अनिलला हा डवरा खणण्याची बुद्धी सुचली असेल. म्हणून मी त्याला म्हटले अरे तू जो डवरा खणतोयस तिथेच बाप्पाची मूर्ती असण्याची शक्यता आहे. तेव्हा आता उद्या खणशिल तेव्हा सावकाश काळजीपूर्वक खण.

बाबांनी असे सांगितल्यानंतर माझी झोप पळाली. जरा दिसायला लागल्यावर मी सहदेवला बोलवायला त्याच्या घरी गेलो. तो देखिल स्वप्नाची हकीगत ऐकल्यावर ताबडतोब आमच्या परसात हजर झाला. दरम्यान रेडिओवरील सकाळच्या भक्ती संगितात सगळी गणपतिचीच गाणी लागली होती. ती गाणी ऐकतच आम्ही खणायला सुरवात केली. जेमतेस सहा इंच खणले नसेल तोच आमची कुदळ अडायला लागली. बाबांनी हळुवारपणाने खणायला सांगितलेले माझ्या लक्षांत होते म्हणून मग आम्ही कुदळीने खणायचे थांबवून कोयतीने हळु हळु माती सैल करुन बाजुला करायला सुरवात केली. थोड्याच वेळात आम्हाला आता दिसतेय ती गणेशाची धुळीत माखलेली मूर्ती दिसली. त्यानंतर मी बाबांना बोलावून आणले. बाबा आल्यावर त्यांनी त्या गणेशाची तशीच धुळीने माखलेल्या अवस्थेतच पूजा केली.

आमच्या घराण्यांत अनेक पिढयांपासुन ब्रह्मणस्पतीसूक्ताचे पठण केले जाते. त्यामुळे त्या उपासनेच्या परंपरेचे फलस्वरुप म्हणून हा ब्रह्मणस्पती विनायक आमच्या परसात प्रकट झाला अशी माझी भावना आहे. म्हणून या बाप्पाला आम्ही ब्रह्मणस्पती

विनायक असे नांव ठेवले आहे. या बाप्पाची पूजा करताना गणपती सूक्त आणि ब्रह्मणस्पती सूक्त यांचे अनुष्ठान केल्यास विशेष फलप्राप्ती होईल अशी माझी धारणा आहे. मधेच अनिलला थांबवून नांनांनी आपली भावना व्यक्त केली.

थोड्याच वेळांत गावात सगळीकडे ही बातमी पसरली आणि सगळे गांव गोळा झाले. काहीवेळाने थोरात गुरुजी आले त्यांनी आज अंगारिका संकष्टी असल्याचे सांगितल्यावर आमच्या आनंदाला पारावारच राहिला नाही. थोरात गुरुजींच्या पुढाकाराने आम्ही मग ती मूर्ती खड्याच्या बाहेर काढली. स्वच्छ पाण्याने धुतल्यावर तिचे दिव्य स्वरुप आमच्या दृष्टीस पडले. बाबांना आपल्या कुळातील गणेश भक्ती फळाला आल्याचे जाणवून धन्यता वाटली.

त्यादिवशी तेथे जमलेल्या सर्व गावक़ऱ्यांनी मिळुन सध्या दिसतोय तो मंडप आणि बाप्पाला ठेवायचा ओटा बांधून काढला. कारण आमच्याकडे सर्व साहित्य उपलब्ध नव्हते परंतु आमच्या गावक़ऱ्यांनी ती उणिव भासु दिली नाही. बाप्पाची स्थापना झाल्यावर माझ्या बाबांनी ब्रह्मणस्पती सूक्ताच्या आणि गणपति सूक्ताच्या पठनाने बाप्पाची षोडशोपचारे पूजा केली. त्यानंतर सर्व गावक़ऱ्यांनी मिळुन आरती केली. रात्री चंद्रोदय झाल्यावर सर्वांच्या सहकार्याने बाप्पाला मोदकांचा नैवेद्य दाखवून सर्वानी याच ठिकाणी महाप्रसाद घेतला.

बाप्पाच्या आगमनाची बातमी जस जशी पसरते आहे तशी रोजच बाप्पांच्या दर्शनाला लोकांची गर्दी होऊ लागली आहे. वास्तविक या ठिकाणी चांगले मंदिर बांधायला पाहिजे परंतु आमची आणि आमच्या गावक़ऱ्यांची देखिल आर्थिक परिस्थिती बेताचिच असल्याने सध्या तरी ते शक्य होईल असे वाटत नाही. सध्या गावक़ऱ्यांच्या सहकार्याने पूजा आरति होते आहे. गावक़ऱ्यांपैकी रोज कोणी ना कोणी येथे वस्तीला रहातात. पाहू बाप्पाच्या मनांत पुढे काय आहे ते. एवढे दिर्घ भाषण संपवून अनिलने जवळच असलेल्या तांब्यातून पाण्याचा घोट घेतला.

अनिलभाऊ तुमची ही अद्‌भूत हकिगत ऐकून मी तर मंत्रमुग्ध झालो आहे. मलाही या बाप्पाने ओढ लावली आहे. आता रात्र झाली आहे, सकाळ झाल्यावर मी तुमच्या त्या डवऱ्याचा, ब्रह्मणस्पती विनायकाचा आणि तुमचा सगळयांचा असे फोटो काढणार आहे. त्यानंतर मुंबईला गेल्यावर ही सर्व हकिगत माझ्या आणि इतरही काही दैनिकांमध्ये देणार आहे. यापुढे मीही जेव्हा जेव्हा दापोली परिसरात येईन तेव्हा तेव्हा येथे नक्की येईन.

****

९

कांतीभाई जडेजा हे शेअर मार्केट मधिल बडे प्रस्थ आहे. त्यांचा दादर चौपाटीला बंगला आहे. घरी नोकरचाकर, गाड्या यांना तोटा नाही. कांतीभाई एकदम देवभोळा माणूस. मूळचे सौराष्ट्रातील जामनगरचे असणारे कांतीभाई वयाच्या अठराव्या वर्षी मुंबईला आपले नशिब आजमावण्याकरीता आले होते. तयार कपड्याचा व्यापार करता करता ते शेअरबाजाराचा देखिल अभ्यास करीत होते. काही काळाने त्यांनी स्वत:चे ब्रोकींगचे लायसन्स घेतले. शेअर बाजारात आज त्यांच्या शब्दाला मान होता. मार्केटच्या टिप घेण्याकरीता अनेकांचे त्यांना फोन येतात. त्यांनी कोणालाही कधीही चुकीचा सल्ला दिला नाही. त्यांची जामनगरच्या सिद्धीविनायकावर खूप श्रद्धा होती. मुंबईमध्येही गणेश उत्सवात त्यांची सगळ्यात जास्त वर्गणी असते. दर संकष्टी आणि विनायकी चतुर्थीला ते प्रभादेवीच्या सिद्धीविनायकाला न चुकता जातात.

आजचा दिवस त्यांच्याकरीता फार महत्वाचा होता. फार मोठा व्यवहार त्यांना आज करायचा होता. झाला तर करोडो रुपयांचा फायदा होणार होता. परंतु अंदाज चुकले तर लाखाचे बारा हजार होण्याची पाळी होती. नेहमीप्रमाणे देवाची साग्रसंगित पूजा केल्यानंतर ते नाश्त्याकरीता डायनिंग टेबलकडे निघाले. तिथे त्यांची पत्नी उमाबेन आणि मुलगी दिव्या नाश्त्याची तयारी करुन त्यांची वाट बघत होत्या. जवळच त्यांचा नोकर कम ड्रायव्हर गोविंदा देखिल साहेबांची वाट बघत उभा होता. जडेजा कुटूंब अनेक वर्षे मुंबईत असल्याने ते सर्वजण चांगले मराठी बोलत असत. शेटजींचा दंडकच असा होता, ज्या ठिकाणी रहायचे तिथली भाषा चांगली अवगत झालीच पाहीजे. त्यामुळे त्यांचे मुंबईमध्ये असताना बोलणे मराठीतच चालत असे.

कांतिभाई नाश्त्याकरीता आल्यानंतर गोविंदाने त्यांना आजचे ताजे पेपर दिले. त्या पेपर वरुन नजर फिरवता फिरवता त्यांनी गोविंदाला विचारले, काय रे गोविंदा तू तयार आहेस नां? आपल्याला आज गडबड आहे. तुझा नाश्ता झाला काय?

नाही, तुमचा झाला की करतोच साहेब! तुमचे पेपर बघुन होईपर्यंत माझा नाश्ता होईल. गोविंदाने उत्तर दिले.

तसं नको! अरे दिव्या त्या गोविंदाला आधी नाश्ता दे! कांतीभाईंनी लेकीला फर्मावले. आणि हे बघं गोविंदा! इथे टेबलवर बसुन नाश्ता कर लाजायचे काही काम नाही. तू आम्हाला घरातलाच आहेस.

बरोबर आहे, गोविंदा चल कर सुरु. उमाबेननी गोविंदाला नाश्त्याची प्लेट देत सांगितले. त्यानंतर गोविंदा आणि कांतीभाई नाश्ता करु लागले. नाश्ता करता करता कांतीभाई पेपरच्या हेडलाईन वाचत होते. अरे! हे काय? वाचता वाचता कांतीभाई एका बातमीवर अडकले. ती बातमी सविस्तर वाचु लागले. अरे गोविंदा! तुझा गांव रत्नागिरी जिल्ह्यातच कुठेतरी आहे नां? अचानक कांतीभाईंनी गोविंदाला प्रश्न विचारला.

हो साहेब! दापोली तालुक्यात आहे माझा गांव. का बरं तिकडची काही बातमी आली आहे कां? गोविंदाने उत्सुकतेने विचारले.

अरे त्या दापोली तालुक्यातच भोस्ते नावांच्या गावांत “ब्रह्मणस्पती विनायक” या नावाचा गणपतीबाप्पा प्रकट झाला आहे. अनेकांच्या नवसाला म्हणे तो पावला आहे. आजच माझा महत्वाचा व्यवहार व्हायचा आहे. तो जर निर्विघ्नपणाने पार पडला तर आपणही त्या बाप्पाच्या दर्शनाला जाऊयां! तुला ते भोस्ते गांव माहित आहे नां? कांतीभाईंनी विचारले.

हो, माझ्या गावाकडे जाताना भोस्ते गावाचा फाटा लागतो. गोविंदाने उत्तर दिले.

आता आपण निघुया! गोविंदा गाडी काढ तिथपर्यंत मी येतोच. असे म्हणून कांतीभाईंनी आपला नाश्ता आवरता घेतला. निघताना देवांना नमस्कार करुन आजच्या व्यवहारात यश मिळु दे म्हणून प्रार्थना केली. पेपर मध्ये छापुन आलेल्या बाप्पाच्या फोटोला देखिल नमस्कार करुन त्यांनी त्याच्याकडे देखिल आजच्या व्यवहारातील सर्व विघ्ने दूर करुन यश दे. अशी प्रार्थना केली. हातातल्या पेपरची घडी करुन तो पेपर त्यांनी आपल्या ऑफिसच्या बॅगेत टाकला. घरापासुन ऑफिसला पोचेपर्यंतच्या प्रवासात त्यांनी भोस्त्याच्या गणपतिची पूर्ण माहिती वाचुन काढली. मनातल्या मनांत जर आजच्या व्यवहारात यश मिळाले तर या "ब्रह्मणस्पती विनायकाचे" चांगले मंदिर बांधुया असा संकल्पही केला.

****

१०

आज विनायकी चतुर्थी आहे. मंडणगड दापोली रस्त्यावरील भोस्ते फाट्यावर आज बरीच गर्दी दिसत आहे. नेहमी या ठिकाणी शुकशुकाटच असतो. परंतु आज तेथे वीस पंचवीसजण दापोलीला जाणाऱ्या बसची वाट बघत उभे होते. त्याचप्रमाणे मंडणगड, मुंबई बाजुकडे जाणारे लोकही बरेच दिसत होते. दोन्ही बाजुला उभ्या असलेल्या लोकांकडे एक गोष्ट कॉमन होती ती म्हणजे प्रत्येकाच्या हातात भोस्त्याच्या "ब्रह्मणस्पती विनायका" प्रसाद होता.

भोस्त्याला गणपती बाप्पा प्रकट झाल्याला आता दिड महिना झाला होता. गणपती बाप्पा प्रगट झाल्यापासुन भोस्त्याला भेट देणाऱ्या भक्तांची गर्दी वाढतच होती. भोस्ते फाट्यावर सध्या भोस्त्यातल्याच एकाने चहाची टपरी चालू केली होती. त्याठिकाणी त्याने चहा, वडापाव, शेवचिवडा असे खाद्य पदार्थ विकायला ठेवले होते. भाविकांकरीता पिण्याचे पाणीमात्र विनामूल्य होते. दोन मोठ्ठे मातीचे रांजण त्याने तेथे भरुन ठेवलेले होते. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसात ते थंडगार पाणी जीवाची तल्खली कमी करीत असे.

मंडणगड कडून येणाऱ्या रस्त्यावरुन एक आलिशान कार आली आणि फाट्यावर थांबली. त्या गाडीच्या ड्रायव्हरने गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली आणि तो चालत त्या चहाच्या टपरीवर गेला आणि त्याने त्या टपरीवरच्या माणसाला भोस्त्याच्या "ब्रह्मणस्पती विनायकाला" जाणारा रस्ता कुठला असे विचारले. तेव्हा त्याने हाच रस्ता भोस्ते गावांत जातो, आपल्याला तिथल्या गणपतीचे दर्शन घ्यायचे असेल तर गाडी गावाच्या बाहेर उभी करावी लागेल. तिथुन जांभ्या दगडाची पाखाडी चढुन गेल्यावर आपल्याला परांजप्याच्या कडे प्रकट झालेल्या बाप्पाचे दर्शन घेता येईल असे सांगितले.

त्यावर त्या ड्रायव्हरने धन्यवाद असे म्हणून आपला मोर्चा रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या आपल्या कार कडे वळवला. आपल्या जागेवर बसुन त्याने पाठीमागे बसलेल्या कांतीभाईंना भोस्त्याचा रस्ता हाच आहे असे सांगुन गाडी त्या रस्त्यावर घेतली.

कांतीभाई आज खूप खुष होते. त्यांना स्वप्नवत वाटणारा व्यवहार त्या दिवशी यशस्वी रीतीने पूर्ण झाला होता. हे सर्व त्या भोस्त्याच्या "ब्रह्मणस्पती विनायकाच्या" कृपेनेच अशी त्यांची पूर्ण श्रध्दा होती. त्यामुळे हा व्यवहार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर त्यांनी लगेचच भोस्त्याच्या बाप्पाच्या दर्शनाला जाण्याचा निश्चय केला होता. त्यादृष्टीने आपल्या दैनंदिन कामकाजाचे नियोजन करायला सुरवात केली होती. ठरवल्या प्रमाणे ते आज विनायकी चतुर्थीचा मुहूर्त साधून आपली मुलगी, पत्नीसह भोस्त्याच्या बाप्पाच्या दर्शनाला आले होते.

बघता बघता त्यांची कार भोस्ते गावाच्या एस्. टी. स्टॉपजवळ आली. तेथे आधीपासुनच काही रिक्षा आणि सहा आसनी रिक्षा उभ्या होत्या. त्यापैकी काही रिक्षा दापोलीहून तर काही मंडणगडहून आलेल्या होत्या. तिथेच खेडहून आलेली एक खाजगी स्पेशल बस देखिल उभी होती.

त्या खेडहून आलेल्या बसच्या ड्रायव्हरला कांतीभाईंचा ड्रायव्हर गोविंदाने गणपती मंदिरात कसे जायचे ते विचारले. त्यावर त्याने आपण आपली गाडी येथेच उभी करा. "ब्रह्मणस्पती विनायक" मंदिरापर्यंत गाडीचा रस्ता नाही असे सांगितले. समोर दिसते त्या पाखाडीने चालत गेल्यावर आपल्याला गणपती मंदीरात जाता येईल. त्याचे म्हणणे ऐकून गोविंदाने गाडी रस्त्याच्या कडेला घेऊन व्यवस्थित पार्क केली. गाडी थांबल्याबरोबर तिच्यामधून कांतीभाई, उमाबेन आणि दिव्या बाहेर पडले. गोविंदा म्हणाला शेट ही जागा अनोळखी आहे मी गाडीतच थांबतो.

त्यावर शेट म्हणाले, अरे आपण बाप्पाच्या दर्शनाला आलोय त्यामुळे सर्व चिंता त्या बाप्पावर सोडून आपण त्याला भेटायला जाऊया. गाडी व्यवस्थित लॉक करुन तू पण आमच्या बरोबर चलं.

ठिक आहे तर मगं चला! असे म्हणून गोविंदाने बरोबर असलेले सामान उचलले आणि त्याने पाखाडी चढायला सुरवात केली. नेहमी चालण्याची सवय नसल्याने उमाबेनला चालताना दम लागत होता. त्यांच्या चालीने सर्वजण पाखाडी चढायला लागले. निम्मी पाखाडी चढुन आल्यावर त्यांना डाव्याबाजुला एक नारळाच्या ओल्या झापांची कमान केलेला, सुपारीच्या आणि माडाच्या झावळयांनी सजवलेला मंडप दिसला. तेथे असलेली गर्दी पाहून ते सर्वजण त्या मंडपात गेले.

****

११

कांतीभाईंनी आपल्या पत्नी आणि मुलीसह त्या मंडपात प्रवेश केला तेव्हा त्यांना समोरच गणपती बाप्पाचे साजरे रुप दिसले. बाप्पाच्या डोक्यावर एका आडव्या वाशाला बांधलेल्या अभिषेक पात्रातून थेंब थेंब दूध पडताना दिसत होते. "ब्रह्मणस्पती विनायका" समोर एका चौरंगावर कुसुंबी रंगाचे रेशमी सोवळे नेसलेला एक गृहस्थ हातामधल्या चांदीच्या फुलपात्रामधून बाप्पावर दुर्वांच्या सहाय्याने पाणी वहात होता. मंडपात दोहोबाजुला एकमेकांकडे तोंड करुन एकवीस पुरोहित बसले होते. त्यांनी सर्वांनी करवती काठाचे पांढरे शुभ्र धोतर नेसले होते आणि तसेच उपरणे खांद्यावरुन घेतले होते.

आज बाप्पावर ब्रह्मणस्पती सूक्ताच्या एकवीस आवर्तनांचा अभिषेक आयोजीत केलेला होता. त्या करीता हे एकवीस पुरोहित दापोली आणि खेडमधून आलेले होते. आता त्यांची ब्रह्मणस्पती सूक्ताची एकसष्टावी ऋचा म्हणणे चालू होते. एकसष्टावी ऋचा संपल्यावर सर्व पुरोहितांनी एकसुरात बासष्टावी ऋचा म्हणायाला सुरवात केली.

अग्निर्येन विराजति सूर्यो येन विराजति।

विराज्येन विराजति तेनास्मन् ब्रह्मणस्पते विराSSजसमिधं कुरु।।

ॐ शांती: शांती: शांती:।।

या ऋचेचा स्वर सर्वत्र आसमंतात भरुन राहीला. पुरोहितांच्या या स्वराने सूर्याचे, अग्नीचे तेजच जणू या मंडपात प्रगट झाले. मंडपात उपस्थित असणारे सर्वच

या वातावरणाने भारुन गेले. दरम्यान ब्रह्मणस्पती सूक्ताची आवृत्ती पूर्ण झाल्यावर पुरोहितांनी गणपतीसूक्ताचे पठण सुरु केले.

ॐ आतून इंद्र क्षुमतं चित्रं ग्रामं संगृभाय। महाहस्ती दक्षिणेन।।

विद्माहित्वा तुविकुर्मिं तुविदेष्णं तुविमघं। तुविमात्रमवोभि:।।

गणपतीसूक्ताच्या पठणाचे स्वर सर्वत्र भरुन राहिले होते. तिथे हजर असणारे सर्वजण या वैदिक सूक्ताच्या पठणाने भारावून गेले. सर्वचजण गणपतिसूक्ताच्या ऋचा श्रवण करताना समोरच असलेल्या बाप्पाच्या सगुण साकार रुपाकडे पहात होते. त्या रुपाकडे बघता बघता आणि कानांनी दिव्य गणपती सूक्त ऐकता ऐकता समाधी अवस्थेत गेले.

यथावकाश चालू असलेली विशेषपूजेचे विधी समाप्त झाले. सर्वांनी मिळुन बाप्पाची आरती केली. आरती झाल्यावर सर्वांनी मिळुन ““ब्रह्मणस्पती विनायक बाप्पा मोरयाSS” असा गजर केला. सर्वांनी एक एक करुन बाप्पाचे दर्शन घेतले.

सर्वांचे दर्शन झाल्यावर नाना परांजपे यांनी सर्वांना महाप्रसाद घेऊनच मंडप सोडावा असे सांगितले. सर्वांचा महाप्रसाद ग्रहण करुन झाल्यानंतर त्या मंडपात मोजकेच लोक उरले. त्यामध्ये कांतीभाई, गोविंद, उमाबेन, दिव्या, आजची पूजा ज्यांनी आयोजित केली होती ते दापोलीचे विनायक जोशी, थोरात गुरुजी आणि दापोलीचे दोन आणि खेडचे दोन भक्त हजर होते.

ज्यांनी आजच्या ब्रह्मणस्पती सूक्ताचे अनुष्ठान आयोजीत केले होते ते विनायक जोशी कांतीभाईंच्या जवळ जाऊन त्यांना आपली ओळख करुन दिली. ते म्हणाले मी विनायक जोशी दापोलीला माझे इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे दुकान आहे. आपण या भागातले दिसत नाही म्हणून मुद्दाम आपली ओळख करुन घ्यावी असे मनांत आले म्हणून आपल्या जवळ आलो आहे. महिन्याभरापूर्वी मी येथे दर्शनाला आलो होतो. त्यानंतर लगेचच माझी एक दिर्घकाल कोर्टात चालू असलेली केस माझ्याबाजुने

झाली. हा कदाचित योगायोग असेल परंतु मला आपले वाटले की, हे सर्व या "ब्रह्मणस्पती विनायक" कृपेने झाले. म्हणूनच आजच्या विनायकीच्या दिवशी मी ब्रह्मणस्पती सूक्ताचे अनुष्ठान आयोजित केले.

नमस्कार! मी कांतीभाई जडेजा! मूळचा गुजराथमधल्या सौराष्ट्र विभागातील जामनगरचा आहे. परंतु गेली अनेक वर्षे मी मुंबईला दादरमध्ये रहातो. माझा देखिल एक व्यवहार या बाप्पाच्या कृपाशिर्वादाने यशस्वी झाला. मी माझी पत्नी आणि मुलीसह आज बाप्पाच्या दर्शनाला आलो आहे. परंतु आपण आज जो विशेष सूक्ताने अभिषेक केलात तो काय प्रकार आहे. मला देवीवर अभिषेक करतात ते श्रीसूक्त माहीत आहे. शिवाय गणपति अथर्वशिर्ष देखील मी नेहमी म्हणतो. आपण मला त्याची सविस्तर माहिती द्याल कां?

हो! हो! का नांही! मी आपल्याला सर्व सविस्तर सांगतो. आज आम्ही ज्या सूक्ताने अभिषेक केला त्या सूक्ताचे नांव आहे श्री ब्रह्मणस्पतिसूक्त. या सूक्ताचे संपादन दापोली जवळच्या अंजर्ले येथील विद्याविनोद या पदवीने सन्मानित केलेल्या नारायणशास्त्री जोशी यांनी केले आहे. धन, विद्या, संतती प्राप्तीकरीता शिवाय निरनिराळ्या संकटापासुन मुक्ती मिळण्याकरीता या सूक्ताने गणपतिला अभिषेक करतात. यामध्ये सकृदावर्तन म्हणजे एकवेळा पठण करणे, एकवीसवेळा पठण करणे, मंडल म्हणजे(२१x२१)४४१ वेळा पठण करणे आणि महामंडल म्हणजे (२१x२१ x२१) ९२६१ वेळा पठण असे प्रकार आहेत. यातील पहिल्या दोन प्रकारांकरीता कोणताही दिवस चालतो. परंतु मंडल आणि महामंडल अनुष्ठान करण्याकरीता शक्यतो चतुर्थी तिथी पहावी. विनायक जोशी यांनी सविस्तर माहिती दिली.

विनायकदादा आपण मला या अनुष्ठानाची सविस्तर माहिती दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मला जर यातले एखादे अनुष्ठान करायचे असेल तर या भोस्ते गावांत काही व्यवस्था करता येईल कां? आपण दापोलीचेच रहाणारे असल्याने

आपल्याला ते सहज शक्य झाले. परंतु माझी येथे कोणाशीच ओळख नाही. तेव्हा आपण मला या बाबतित सहकार्य कराल याची मला खात्री आहे.

नक्कीच मी आपल्याला मदत करीन कांतीभाई आपल्याला जर ब्रह्मणस्पतीसूक्ताचे या ठिकाणी भोस्त्याला करायचे असेल तर मी आज आणलेली सर्व टिम परत आपल्याला उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीन. फक्त मला पुरेसा अवधी मिळाला पाहिजे कारण आज येथे ब्रह्मणस्पती सूक्त म्हणणारे पुरोहित निरनिराळ्या गावातून आले आहेत. एका ठिकाणी २१ जण मिळू शकणार नाहीत. जर आपल्याला मंडल अनुष्ठान करायचे असेल तर त्याला २१ पुरोहितांना किमान चार ते पांच तास लागतील.

विनायकदादा मला या "ब्रह्मणस्पती विनायक" बाप्पाची संपूर्ण माहिती हवी आहे. शिवाय मला ज्यांच्याकडे ही बाप्पाची मूर्ती सापडली त्यांना देखिल भेटायचे आहे. आपण त्यांची भेट घालून देऊ शकाल काय? मला या बाप्पाला असे उघड्यावर बघुन खूप दु:ख होते आहे. बाप्पाकरीता मंदिर बांधण्याचा काही विचार चालू असेल तर मला त्यात माझेही योगदान द्यायचे आहे. कांतीभाईंनी आपला मनोदय सांगितला.

अहो कांतीभाई माझाही असाच काहीसा विचार आहे. तेव्हा आपण दोघे मिळुन यात पुढाकार घेऊया त्यामुळे माझ्याही मनाला समाधान मिळेल. त्याकरीता आपल्याला नाना आणि अनिल परांजपे यांना भेटायला लागेल. मी नानांना अनेक वर्षा पासुन ओळखतो खूप साधी माणसे आहेत ती.

इतक्यात त्यांना थोरात गुरुजी दिसले त्यांना पाहून ते म्हणाले, हे बघा थोरातगुरुजी समोर दिसताहेत. त्यांना मी आपला विचार सांगतो. तेही गणेशभक्त आहेत. तसे नाना परांजपे देखिल गाणपत्य आहेत. त्यांच्या घराण्यात अनेक

पिढ्यांपासुन गणेशाची उपासना केली जाते. बोलता बोलता विनायकदादांनी थोरात गुरुजींना आपल्या जवळ येण्याकरीता खूण केली.

थोरातगुरुजी जवळ येताच विनायकदादांनी कांतीभाईंची त्यांच्याशी ओळख करुन दिली. थोरातगुरुजींनी कांतीभाईंना नमस्कार केला आणि मी थोरातगुरुजी या भोस्ते गावातच शिक्षक आहे. आपले या गावात मी स्वागत करतो अशी आपली ओळख करुन दिली.

एकमेकांची ओळख होताच कांतीभाईंनी मला या "ब्रह्मणस्पती विनायक" बाप्पाची मूर्ती ज्यांना सापडली त्यांना भेटायची इच्छा असे सांगितले. तसेच बाप्पाचे मंदिर बांधायची काही योजना असेल तर त्यात योगदान देण्याची माझी इच्छा आहे, तेव्हा आपण माझी नाना परांजपे यांची भेट घालून द्यावी ही विनंती.

कांतीभाई आणि विनायक दादा सध्यातरी मंदिर बांधायची काही योजना नाही. कारण या गावातले गावकरी भाविक असले तरी त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. काहीजण खाऊन पिऊन सुखी आहेत परंतु एक मुठीने पैसे खर्च करु शकतील असे कोणीच नाही. ज्यांना बाप्पा सापडला त्या नानांची परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. त्यांचा आशेचा किरण असणारा अनिल सध्या बेकारच आहे. त्यांची जमिन देखिल जेमतेम रोजचा ताक भाताला पुरेल एवढीच आहे. सध्या आपल्याला जो झापांचा मंडप दिसतो आहे तो देखिल याच्या त्याच्याकडून चार चार झाप आणि वासे जमवून गावकऱ्यांनी तयार केला आहे. आता पाऊस आला की, तो देखिल निकामी होईल. थोरात गुरुजींनी सत्य परिस्थिती कथन केली.

गुरुजी मंदिर बांधण्याकरीता पैसा हा विषय दुय्यम आहे. त्या नानांची परवानगी असेल तर मी मंदिराचा सर्व खर्च करु शकतो. तेव्हा आपल्याला आधी नानांना आणि अनिल परांजपे यांना भेटायला पाहीजे. त्यानंतर सर्व गोष्टीतून मार्ग काढता येईल. कांतीभाईंनी आपली भूमिका सांगितली.

चला तर मगं! आत्ताच आपण परांजप्यांच्या घरी जाऊ या. आता ते जरा निवांत असतील. असे म्हणून थोरातगुरुजी उठले, त्यांच्याबरोबर कांतीभाई, त्याची मुलगी, पत्नी आणि विनायकदादा परांजप्यांच्या घराकडे निघाले.

****

१२

थोरात गुरुजी सर्वांना घेऊन परांजपे यांच्या घरात गेले. नाना परांजपे आणि अनिल आणि त्याची आई त्यांच्या माजघरात बसले होते. आत आल्यावर गुरुजींनी नाना परांजपे यांना कांतीभाई, उमाबेन आणि दिव्या यांची ओळख करुन दिली. त्यानंतर सर्वजण तिथेच एका सतरंजीवर बसले. विनायक दादांनी नानांना आपण मला ओळखताच असे म्हणून आपली उपस्थिती जाहिर केली.

अनिलभाऊ! या कांतीभाईंना आणि मला आपल्याकडून बाप्पाच्या प्रकट होण्याची सर्व हकिगत ऐकायची आहे. त्याचप्रमाणे मंदिर बांधण्याची काय योजना आहे कां याविषयी देखिल समजाऊन घ्यायचे आहे. विनायक दादांनी अनिलभाऊंकडे विचारणा केली.

कांतीभाईंची आणि विनायक दादांची उत्सुकता ऐकून अनिलने "ब्रह्मणस्पती विनायक" बाप्पाच्या आगमनाची सविस्तर हकीगत सांगितली. त्यानंतर त्याने मंदिर बांधण्याच्या बाबतीत काहीच योजना ठरवलेली नाही असे सांगितले. कारण मंदिर बांधायचे म्हटले तर फार मोठ्या प्रमाणात पैसा लागेल. येथे आमची आणि आमच्या गावक़ऱ्यांची देखील आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने आम्ही फारतर ज्याला आमच्याकडे घुमटी म्हणतात त्या पध्दतीने छोटेसे मंदिर आम्ही बांधु त्यामुळे बाप्पावर उन्हापावसात सावली होईल आणि जागाही फारशी अडकून रहाणार नाही. आत्ताची मंडपाची सोय देखिल गावक़ऱ्यांनी मिळुन केलेली आहे. परंतु ती पावसात काही उपयोगाची नाही.

हे पहा अनिल भाऊ! माझा मुंबईत मोठा व्यवसाय आहे. आज मी येथे गणपतीबाप्पाच्या दर्शनाला येण्याचे कारण देखिल या बाप्पाच्या आशिर्वादाने माझे मोठ्ठे डिल यशस्वी झाले हे आहे. त्या व्यवहारात मला लाखो रुपयांचा नफा झाला आहे. माझी अशी इच्छा आहे की, या "ब्रह्मणस्पती विनायकाचे" मंदिर बांधण्याचा पूर्ण खर्च मी करावा. त्याकरीता आपण मला परवानगी द्यावी. शिवाय दापोलीला जाणाऱ्या मुख्य रस्त्या पासुन भोस्ते गावातील या मंदिरापर्यंत येणाराही रस्ता मी बांधु इच्छीतो. तेव्हा अनिलभाऊ आणि नाना आपण माझ्या या विनंतीला आपली संमती द्यावी अशी आपणाकडे प्रार्थना आहे.

कांतीभाईं जर आर्थिक भार सोसणार असतील तर मंदिराच्या आणि रस्त्याच्या बांधकामाची व्यवस्था करणे, त्यावर देखरेख करणे वेळच्यावेळी मटेरीयल पुरवणे या बाबींकडे मी जातीने लक्ष देईन. या शिवाय माझ्याकडून शक्य होईल तितका आर्थिक भार देखिल मी स्विकारायला तयार आहे. विनायक दादांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

त्या दोघांच्या मनोगता नंतर आता नानांनी बोलायला सुरवात केली. कांतीभाई आणि विनायकदादा आपण मंदिर बांधण्याच्या कामी पुढाकार घेऊन सर्व व्यवस्था करायला तयार झालात त्याबद्दल मी आपला मनापासुन आभारी आहे. परंतु माझी अडचण अशी आहे की, माझ्या या सध्याच्या जागेत भव्य मंदिर बांधले तर ती जवळपास सगळी जमिन मंदिराकरीता वापरायला लागेल.

माझ्याकडे कुटुंबाच्या चरितार्थ चालवण्याकरीता ही जमिन हाच एकमेव आधार आहे. तोच जर मंदिर बांधण्याकरीता मी नाहिसा केला तर माझ्या कुटूंबाचा चरितार्थ कसा चालवायचा याची मला चिंता निर्माण होईल. आपण म्हणाल मंदिरात भाविक जे अर्पण करतील त्यावर चालू शकेल. परंतु ते तर अळवावरचे पाणी. आज येथे गर्दी दिसतेय तशीच कायम राहिल असे खात्रीने सांगता येणार नाही.

नाना आपण म्हणताय ते बरोबरच आहे. परंतु आपण त्याची चिंता करु नका. आपल्या जमिनीच्या सर्व भागात काही मंदिर बनणार नाही. मंदिर बांधून जी जमिन उरेल तेथे आपण आपल्या कुटूंबाला कोणतिही आर्थिक चिंता उरणार नाही असा व्यवसाय निर्माण करुया. त्यासाठी लागेल ते अर्थ सहाय्य मी करेनच. असा काही व्यवसाय केला तर आपल्या बरोबर आपल्या गावक़ऱ्यांच्याही रोजगाराची सोय करता येईल. कांतीभाईंनी एक प्रस्ताव समोर ठेवला.

नाना! मंदार! कांतीभाईंचा हा प्रस्ताव मात्र मला योग्य वाटतो. सध्या जो जांभ्या दगडाच्या कातळाचा भाग आहे तेथे मंदिर उभे राहू शकते. उरलेल्या जागेत काजू बीवर प्रक्रिया करणे, आंब्याचे केनिंग करणे, करवंदे, जांभळे यांचे निरनिराळे पदार्थ बनविणे हा व्यवसाय तेथे चालू कराता येईल. त्या करीता लागणारा कच्चा माल आपल्या दापोली आणि मंडणगड तालुक्यांत मुबलक आहे. तेव्हा हा प्रस्ताव स्विकारायला हरकत नाही असे माझे मत आहे. थोरात गुरुजीनी व्यवसाय कोणता करावा हा प्रश्न देखिल सोडवून टाकला.

या सर्वांची ही चर्चा चालू असताना अनिल मात्र मनाने कोसळत होता. त्याची सद्सद्विवेक बुध्दी त्याला गप्प बसुन देत नव्हती. ही चर्चा ऐकताना त्याच्या मनाला पिळ पडत होता. मनावर मोठा ताण आल्याने त्याच्या डोळयांतून घळा घळा अश्रू वहायला सुरवात झाली. सर्वजण चर्चेत इतके मग्न होते की, अनिलच्या बदललेल्या मनस्थितीकडे कोणाचेच लक्ष नव्हते. परंतु बाहेर पडवीत बसलेल्या गोविंदाचे अनिलकडे लक्ष गेले. अनिलच्या डोळयांतून वहाणारे अश्रु पाहून तो आत आला आणि त्याने अनिलला विचारले, अनिलभाऊ काय झाले? तुमच्या डोळयातून अश्रुंची धार लागली आहे! चेहरा देखिल पार कोमेजून गेला आहे!

चाललेल्या चर्चेत मध्येच गोविंदाचा आवाज ऐकून सर्वांचेच लक्ष आता अनिलकडे गेले. सतरंजीवर बसलेले थोरात गुरुजी उठुन अनिलकडे गेले. त्यांनी अनिलला जवळ घेतले त्याचे डोळे पुसत त्याला विचारले अरे अनिलबाळा! काय झाले

तुझा चेहरा कां असा झालाय? इथे चालू असलेली चर्चातर योग्य दिशेने चालू आहे. मग तुला दु:ख कशाचे होतेय?

गुरुजी! नाना! आई! मी तुम्हाला सगळ्यांना फसवले. तुमच्या श्रध्देचा गैरफायदा घेतला. सुरुवातीपासुनच मी तुम्हाला फसवत आलो आहे. आपण आत्ता पूजा करतोय ती बाप्पाची मूर्ती मला लाटवणच्या समुद्रकिनाऱ्यावर सापडली. ती तिथे तशीच सोडून यायला मन घेईना. म्हणून माझ्या मित्रांनी आणि मी ही मूर्ती इकडे भोस्त्याला आणायची ठरवली. त्याकरीता एक जुनी ट्रंक घेतली त्या ट्रंकेत घालून एस्. टी.ने ती मूर्ती मी इकडे भोस्त्याला आणली. त्यानंतर माझ्या मनात कपट आले. मी बाबांनासुध्दा मी अशाप्रकारची मूर्ती घेऊन आलो आहे असे सांगितले नाही. नंतर मी डवरा खणायचे नाटक करुन अंगारिका संकष्टीच्या आदल्या रात्री त्या मूर्तीला त्या खड्यात ठेवली आणि वरुन माती लोटली.

नंतर पहाटे बाबांना स्वप्न पडल्याचे खोटे सांगुन सहदेवला बोलावून आणले आणि ती मूर्ती बाहेर काढली. त्यानंतरचे सर्व आपल्याला माहित आहेच. आत्ता या ठिकाणी मोठे मंदिर बांधण्याच्या आणि व्यवसाय सुरु करण्याची चर्चा सुरु झाली आणि माझे संस्कार जागे झाले. मी केलेल्या खोट्या कर्माचा मला पश्चाताप झाला. आता या खोट्याच्या आधारावर प्रकट झालेल्या मूर्ती करीता मंदिर बांधायचे किंवा नाही हे आता तुम्ही लोकांनी ठरवावे.

अनिल! मला तुझी लाज वाटते. अरे! आपले घराणे गाणपत्य! त्या घराण्याच्या दैवताचीच तू चेष्टा केलीस. गणपतीची उपासना काय साधी वाटली तुला? कितीही दारिद्र्य आले तरी त्याची तमा न बाळगता आपल्या पूर्वजांनी गणेशभक्ती टिकवून ठेवली. त्या श्रध्देचा तू तुझ्या वागण्याने अपमान केला आहेस. नाना सात्विक संतापाने बोलले आणि स्वत:च स्वत:ला दोष देत राहिले आणि ते मान खाली घालून बसुन राहिले.

आता विनायक दादा पुढे झाले. त्यांनी नानांच्या पाठिवर हात ठेवून त्यांना शांत व्हायला सांगितले. नाना! अहो अशा किरकोळ गोष्टीने कोणाच्याही श्रध्देला तडा जायला ती काय इतकी कमकुवत कां आहे? माझी, या कांतीभाईंची श्रध्दा काय तो देव तुमच्या डवऱ्यात सापडला म्हणून आहे? आज मी जे ब्रह्मणस्पती सूक्ताचे अनुष्ठान केले ते काय तो डवऱ्यांत सापडला म्हणून केले होते. आणि असे बघा ही परमेश्वराचीच योजनाच नाही कां? नाहीतर त्या लाडघरच्या समुद्रकिनाऱ्यावर अनिलच्या आधी कित्येकजण गेले असतील. परंतु अनिलच्याच पायाला ठेच कां लागली? त्याच्या मित्रांच्या पायाला का लागली नाही? अहो गाणपत्य घराण्याचा वारसा त्याच्याकडे आहे. म्हणूनच बाप्पाने त्याला आपले वाहन केले. नाहीतर तो देखिल एवढी अवजड मूर्ती उरापोटावर घेऊन इकडे भोस्त्याला कशाला आला असता?

अनिलभाऊ! आता तुम्हाला पश्चाताप झाला आहे नां? ह्रदयापासुन झालेल्या पश्चातापाने सर्व पापे नष्ट होतात, येथे तुम्ही कोणाचे नुकसानही केले नाही. तेव्हा तुम्ही आता स्वत:ला अपराधी मानायचे सोडून द्या. तुमची चुक काय आहे तर, तुम्ही ती मूर्ती त्या डवऱ्यात लपवून नंतर बाहेर काढलीत. नाहीतरी तुमचा उद्देश ती मूर्ती परत सागरार्पण न होता तिची पूजा व्हावी हाच होताना? तुम्ही फक्त घास सरळ न घेता त्याला थोडेसे वळण दिलेत. अहो बाप्पाची इच्छा नसती तर तुमची काय हिमंत होती ती लपवायची आणि परत बाहेर काढायची. अशाप्रकारे त्या डवऱ्यातून प्रकट होण्याची त्याचीच इच्छा होती. तसे नसते तर मी काय किंवा हे विनायक भाऊ काय या भोस्ते गावात दर्शनाला आणि अनुष्ठानाला आलो असतो काय? त्या बाप्पाने तुमच्यामार्फत ही लिला केली एवढेच. तेव्हा नाना तुम्ही आणि अनिल तूही कोणतीही अपराधी भावना मनांत ठेवु नको. कांतीभाईंनी आपली भूमिका मांडली.

नाना कांतीभाई म्हणतात ते खरं आहे. तुमच्या घराण्याने आतापर्यंत केलेल्या उपासनेचे फळ म्हणून हा बाप्पा अनिलच्या मार्फत तुमच्याकडे चालून आला हीच तुमची भावना आहे नां! मग ती बरोबरच आहे. त्यानेच अनिलला डवऱ्यात लपविण्याची बुध्दी दिली. असे जर झाले नसते, तर ते पत्रकार येथे आले असते काय? त्यांनी दिलेल्या बातमीमुळे नुसत्या महाराष्ट्रात नाहीतर सर्वत्र ही बातमी पसरली. त्यामुळेच या कांतीभाईंना तो पेपर सापडला, त्यांचा व्यवहार यशस्वी झाला. अहो ही सर्व त्या बाप्पाचीच योजना होती. तेव्हा तुम्हाला अनिलची लाज वाटायच्या ऐवजी अभिमान वाटला पाहिजे. थोरात गुरुंजीनी आपले परखड मत व्यक्त केले.

****

१३

आज पौष महिन्यातली संकष्टी चतुर्थी. गेल्यावर्षी याच दिवशी भोस्ते गावांत "ब्रह्मणस्पती विनायकाचे" आगमन झाले होते. बाप्पांच्या या प्रकट दिनाचा वर्धापन दिन आज भोस्ते गावांत दिमाखात साजरा करण्यांत येत आहे. दापोली मंडणगड रस्त्यापासुन थेट "ब्रह्मणस्पती विनायकाच्या" मंदिरापर्यंतचा नवीन झालेला कॉंक्रीटचा रस्ता रांगोळ्यांनी सजवण्यात आला आहे. भोस्तेफाट्यावर मोठ्ठी कमान उभारलेली आहे. त्या कमानीवर सिध्दीविनायकाच्या फोटोसह गणेशभक्तांचे स्वागत करणारा फ्लेक्स बोर्ड लावला आहे.

भोस्त्याच्या एस्. टी. स्टॉपवर आता कोणीही चकाट्या पिटत बसत नाही. कारण आता गावातल्या कोणालाच रिकामा वेळ राहिला नव्हता. एस्. टी. स्टॉपवर आता गाड्यांकरीता पार्कींगची सोय केली आहे. तिथे एक माणूस कायम वॉचमन म्हणून ठेवलेला होता. तिथे पार्कींग करण्याकरीता नाममात्र शुल्क घेण्यात येते. तेवढ्या पैशात तिथे काम करीत असलेल्या वॉचमनचा पगार सुटतो आहे. लोकांनाही सुरक्षित पार्कींग उपलब्ध झाले आहे.

लाल गुलाबी रंगाच्या संगमरवरापासुन "ब्रह्मणस्पती विनायकाचे" भव्य मंदिर चार महिन्यापूर्वीच बांधून पूर्ण झाले आहे. "ब्रह्मणस्पती विनायकाचे" मंदिर आणि "ब्रह्मणस्पती विनायक" फ्रुट अँड कॅश्यु प्रोसेसिंग हा कारखाना उभारण्याचे काम एकाचवेळी चालू करण्यांत आले होते. परंतु कारखान्याचे काम लवकर संपले. मंदिराच्या कामात कलाकुसर होती म्हणून त्याला जरा जास्त वेळ लागला होता.

नाना परांजपे यांच्या जांभ्या दगडाचा कातळ असलेल्या जागेपैकी निम्या जागेत मंदिराची उभारणी केली गेली आहे. उरलेल्या जागेत आंब्याचे केनिंग,

काजुच्या बोंडापासुन निरनिराळे पदार्थ, काजुबियांवर प्रक्रिया करुन त्याचे निरनिराळे प्रकार बनविणे, याशिवाय करवंदे, रातांबे, जांभुळ यांच्यापासुन सरबत वनविणे याकरीता कारखाना उभारला गेला आहे. त्या कारखान्यांत सध्या भोस्ते गावातील पन्नासजण काम करीत आहेत. याशिवाय आजुबाजुच्या गावातील पन्नास साठ माणसे जशी गरज लागेल तसे कामाला येत असतात.

"ब्रह्मणस्पती विनायकाच्या" मंदिराची उभारणी करण्याकरीता थेट राजस्थानमधून कारागिर आले होते. गेले सहा महिने ते रात्रंदिवस काम करीत होते. अजूनही किरकोळ काम चालू आहे. मंदिराच्या प्रांगणात जांभ्या दगडाची फरसबंदी केलेली आहे. त्या फरसबंदिच्या मधे मधे मातीचे चौकोन तयार करुन त्यामध्ये दुर्वांची लागवड करण्यांत आलेली आहे.

मंदिराच्या पाठिमागच्या बाजुला एकवीस प्रकारच्या जास्वंदीची लागवड केली आहे. या शिवाय गणपतीच्या पत्रीमध्ये समावेश असलेल्या पिंपळ, बेल, शमी, दुर्वा, धोत्रा, तुळस, माका, बोर, आघाडा, रुई, अर्जुन, मरवा, केवडा, अगस्ती, कण्हेर, मालती, डोरली, डाळींब, जाई, विष्णूक्रांता, देवदार यापैकी देवदार सोडून सर्व झाडांची लागवड करण्यांत आली आहे. यापैकी, बेल, पिंपळ, शमी यासारखे वृक्ष वर्गात मोडणारी झाडे नवीन बांधलेल्या कॉंक्रीटच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला लावण्यात आली आहेत. तर झुडुपांच्यामध्ये मोडणारी झाडे कुंपणाला लावली आहेत. त्यांची निगा राखण्याचे काम दोघाजणांकडे सोपवले गेलेय त्याबद्दल त्यांना मासिक मानधन चालू केले गेले आहे.

गेले एकवीस दिवस "ब्रह्मणस्पती विनायक" मंदिरात बाप्पाच्या आगमनाच्या वर्धापन दिनाचा सोहळा सुरु झालेला आहे. त्यासाठी २१ पुरोहीत निरनिराळ्या ठिकाणाहून येथे आले आहेत. ब्रह्मणस्पती सूक्ताचे महामंडल अनुष्ठान गेल्या वीस दिवसांपासुन सुरु आहे. आज त्या अनुष्ठानाची सांगता होम हवन करुन होणार आहे. मंदिर बांधून पूर्ण झाल्या दिवसापासुन दररोज दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत येणाऱ्या

भक्तांना प्रसाद म्हणून डाळ तांदूळाची खिचडी आणि सिध्दीविनायक फ्रुट अँड कॅशु प्रोसेसिंग कारखान्यात तयार झालेले लोणचे देण्यात येते. हा महाप्रसाद बनविण्या करीता लागणारा तांदूळ वगळता सर्व खर्च विनायक दादा करतात. या शिवाय अन्नदान देणारे भाविकही कधी कधी हा खर्च उचलतात.

आजच्या कार्यक्रमाकरीता दापोलीहून विनायक दादा त्यांच्या परिवारासह आलेले आहेत. हे मंदिर उभारणीसाठी त्यांनी खूपच मेहनत घेतली. आराखडा तयार करण्यापासुन ते अगदी राजस्थानहून कारागिर आणण्यापर्यंत त्यांनी व्यवस्था केली. या शिवाय मटेरीयल जमा करणे, चालू असलेल्या कामावर देखरेख ठेवणे ही कामे देखिल त्यांनी भक्ती भावाने केली. त्याकरीता ते गेले वर्षभर जवळ जवळ रोजच भोस्त्याला भेट देत होते.

कांतीभाईंनी कबुल केल्याप्रमाणे मंदिर आणि कारखाना उभारणी करता लागणारी आर्थिक बाजु सांभाळली. ते देखिल आज येथे परिवारासह आले आहेत. सुरवातिला अनुष्ठान सुरु करण्याकरीता ते सपत्निक आले होते. ब्रह्मणस्पती विनायकाच्या कृपेने त्यांच्या व्यवसायात वाढच होत गेली.

थोरात गुरुजींनी स्थानिक पातळीवर लागणारी सर्व मदत केली. भोस्ते गावातल्या गावकऱ्यांनी रस्ता बनविण्याकरीता आणि मंदिराच्या सुशोभिकरणाकरीता श्रमदान केले. बाप्पाच्या पत्रीमधिल झाडांची रोपे मिळवून त्यांची योग्य जागी लागवड करण्याचे काम गावकऱ्यांनी केले. या शिवाय दररोज तयार होणाऱ्या खिचडी प्रसादाकरीता आपापल्या शेतात तयार होणाऱ्या भाताचा ठराविक हिस्सा स्वखुशीने ते मंदिरात पोच करतात. गावच्या महिला बचत गटाने दररोजच्या खिचडी प्रसाद बनविण्याची कामगिरी स्विकारली आहे. गावकऱ्यांच्या या सहभागाकरीता थोरात गुरुजींनी त्यांना मोटिव्हेट केले.

ब्रहमणस्पती विनायकाच्या दैनंदिन पूजेची जबाबदारी अनिलने स्विकारली आहे. या करीता त्याने आपल्या वडिलांकडून गणपती सूक्त आणि ब्रह्मणस्पती सूक्ताची

संथा घेतली. आता दररोजच्या बाप्पाच्या पूजेला या दोन्ही सूक्तांचे आणि गणपती अथर्वशिर्षाचे अनुष्ठान तो करतो. मंदिराकरीता सर्व खर्च कांतीभाईंनी केला असला तरी त्याची मालकी त्यांनी नाना परांजपे यांच्या कडेच ठेवली आहे. दर संकष्टीला बाहेरुन पुरोहित बोलावून ब्रह्मणस्पती सूक्ताचे २१ आवर्तनांचे अनुष्ठान केले जाते. त्याकरीता विनायक दादा स्वत: सर्व तयारी करतात आणि अनुष्ठानाला हजर रहातात.

ब्रह्मणस्पती विनायकाच्या रोजच्या आरतीला गावातले झाडुन सगळे हजर असतात. आरती झाली की, तेथेच संस्कार वर्ग चालवला जातो. या वर्गात निरनिराळी स्तोत्रे नाना शिकवतात. मंदिरातील दैनंदिन पूजाअर्चा झाल्यावर अनिल कारखान्याचे काम बघतो. आता त्याला कामातून रिकामा वेळच मिळत नाही. अशाप्रकारे या ब्रह्मणस्पती विनायकाने अनिलचा आणि त्याच्या गावातील गावक़ऱ्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटवला. गावाची भरभराट झाली.

।। ॐ गं गणपतये नम: ।।

ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत

राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान